CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
★ मुंबई, बुधवार,
२५ सप्टेंबर २०२४

# हस्तांतरण शुल्क रद्द करण्याचे आश्वासन

## सिडकोच्या आगामी बैठकीत नवा प्रस्ताव मांडणार

लोकसत्ता प्रतिनिधी



सिडको भवनमध्ये अध्यक्ष, सिडको अधिकारी आणि सिटीझन फाऊंडेशनचे पदाधिकारी यांच्यात बैठक झाली.

**नवी मुंबई :** नवी मुंबई व पनवेलकरांकडून सिडको वसूल करीत असलेले मालमत्तेचे हस्तांतरण शुल्क अवाजवी असल्याचा आरोप करत गृहनिर्माण संस्थांच्या प्रतिनिधींनी हे शुल्क रद्द करण्याची मागणी केल्यानंतर सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट मंगळवारी सिटीझन फाऊंडेशन पदाधिकाऱ्यांना भेटीसाठी बोलावले होते. मालमत्ता हस्तांतरण शुल्क रद्द करण्यासंदर्भात प्रस्ताव सिडको संचालक मंडळाच्या पुढील बैठकीसमोर मांडण्यात येईल, असे आश्वासन अध्यक्ष शिरसाट यांनी दिले.

या बैठकीला फाऊंडेशनचे अध्यक्ष सतीश निकम, सहकार भारतीचे अध्यक्ष प्रमोद जोशी, नवी मुंबई सोसायटी फेडरेशनचे भास्कर म्हात्रे, सुभाष म्हात्रे, सुनील चौधरी, व्यापारी संघाचे सुनील छाजेड, त्रिवेनी सालकर, कृष्णकांत निमसे, उदय तांदळे, रोहीत गुप्ता, विनित मोरे, रश्मी सकपाळ हे उपस्थित होते.

नवी मुंबई सिटीझन्स फाऊंडेशनचे पदाधिकारी मागील अनेक महिन्यांपासून रहिवाशांच्या विविध संस्थांना एकत्र करून याविषयी आवाज उचलण्यासाठी झटत आहेत. विविध राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसह फाऊंडेशनच्या शिष्टमंडळाने भेट घेतली. नवी मुंबई व पनवेल परिसरातील सुमारे साडेतीन हजार गृहनिर्माण संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी फाऊंडेशनला समर्थनासाठी निवेदने दिली आहेत. त्यामुळे सामाजिक व राजकीय अशा दोन्ही स्तरावर हा लढा सुरू आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुद्धा सिडकोचे अध्यक्ष शिरसाट यांना याबाबत लक्ष घालण्याच्या सूचना दिल्यावर ही बैठक बोलावण्यात आली होती. प्रत्येक मालमत्ता खरेदी-विक्रीनंतर सिडकोच्या कार्यालयात या मालमत्तेचे हस्तांतरण शुल्क सिडकोला भरावे लागत असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.

नवी मुंबई व पनवेल या दोन्ही परिसरांत महापालिका अस्तित्वात असून तेथील पायाभूत सुविधा या स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत (महापालिका प्रशासन) पुरविल्या जात असल्याने सिडको या मालमत्तेचे शुल्क आकारत असल्याने नागरिकांमध्ये संताप आहे. फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन त्यांच्याकडे आर्जव केली होती. मुख्यमंत्र्यांनी हस्तांतरण शुल्क हटवण्यास सकारात्मक प्रतिसाद देत सिडकोचे अध्यक्ष शिरसाट यांना नवी मुंबईतील जनसामान्यांना दिलासा देण्यासाठी पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. शिरसाट यांनी संपूर्ण विषय फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांकडून समजून घेतल्यानंतर मंगळवारी सिडको भवन येथे बैठक बोलावली होती. या विषयी प्रस्ताव चर्चेसाठी सिडको संचालक मंडळाच्या पुढील बैठकीत मांडण्यात येण्याचे निर्देश सिडको अध्यक्षांनी दिले.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

# पुण्य नगरी

## सिडकोच्या भूखंडावर अनधिकृतपणे डेब्रिज रिते



### पाच डंपर जप्त, चालकांविरोधात तक्रार दाखल

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील सिडकोने संपादित केलेल्या व संपादित करण्यात येणाऱ्या भूखंडावर अनधिकृतपणे डेब्रीज टाकणाऱ्यांविरुद्ध सिडकोच्या दक्षता विभागाच्या पथकाने सोमवरी मोठी कारवाई केली. यात ५ डंपर आणि त्यावरील चालक यांच्या विरोधात न्हावाशेवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

सिडको महामंडळाने ठाणे व रायगड जिल्ह्यातील संपादित केलेल्या तसेच संपादित करण्यात येत असलेल्या जमिनीवर, भूखंडावर मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे डंपरचालकांकडून डेब्रिज टाकण्यात येते. हे डेब्रिज पर्यावरणास हानीकारक असल्याचे निदर्शनास आले आहे. सिडको हद्दीत टाकण्यात येणाऱ्या अनधिकृत डेब्रिजला आळा घालण्याच्या दृष्टीने गव्हाण जासई रोड, एमटीएचएल लेबर कॅम्प, स्टार कंटेनर यार्डच्या बाजूला, नवी मुंबई येथे मानवी आरोग्यास हानीकारक असलेले डेब्रीजने भरलेले डंपर पाच चालक रिते करण्याच्या प्रयत्नात असताना मिळून आले. हे पाचही डंपर जप्त करण्यात आले. तसेच डंपर चालकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

Navi Mumbai Edition
Sep 25, 2024 Page No. 03
Powered by: erelego.com

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**लोकमत**

# सिडकोच्या हस्तांतरण शुल्कावर निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई** : सिडकोकडून आकारण्यात येणाऱ्या हस्तांरण शुल्काबाबत आठ दिवसांत निर्णय घेण्याची ग्वाही सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांनी दिली. यासंबधीचा प्रस्ताव सिडको संचालक मंडळाची मंजुरी घेतली जाईल, असे स्पष्ट केले.

सिडकोच्या माध्यमातून मालमत्ता खरेदी विक्री प्रकरणात आकारण्यात येणारे हस्तांतरण शुल्क रद्द करावे, या मागणीसाठी सामाजिक संघटनांनी एल्गार पुकारला आहे. त्याविरोधात जनजागृती केली जात आहे. नवी मुंबई सिटीजन्स फौंडेशन, नवी मुंबई सोसायटी फेडरेशन व सहकार भारती या संस्थांच्या शिष्टमंडळाने संजय शिरसाट यांची भेट घेवून याबाबत निवेदन केले. ज्वलंत प्रश्नावर कार्यवाही सुरू केल्याबद्दल शिष्टमंडळाच्या वतीने शिरसाट यांच्या यावेळी सत्कार केला. शिष्टमंडळात विजय नाहटा, सतीश निकम, प्रमोद जोशी, भास्कर म्हात्रे, सुभाष म्हात्रे, सुधीर दाणी, त्रिवेणी सालकर, कृष्णकांत निमसे, सुनील छाजेड, सुनील चौधरी, रश्मी सकपाळ, उदय तांदळे आदींचा समावेश होता.

Hello Navi Mumbai
Page No. 4 Sep 25, 2024
Powered by: erelego.com

**CIDCO** WE MAKE CITIES

NEWS

नवराष्ट्र | मुंबई, २५ सप्टेंबर २०२४

## नवी मुंबईकरांना सिडको अध्यक्षांना दिले आश्वासन; बोर्ड मीटिंगमध्ये मांडणार विषय

# हस्तांतरण शुल्क; मिळणार मुक्ती

१ नवी मुंबई, (वा.) नवी मुंबईतील हस्तांतरण शुल्क बंद करण्याबाबत शहरात चळवळ उभी राहिली आहे. नवी मुंबई ,पनवेलमधील हजारो सोसायट्यांनी या चळवळीला पाठिंबा दर्शविला आहे.

समितीने पाठपुरावा करत वर्षा या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी भेट घेत मुख्यमंत्र्यांकडे हा विषय मांडला होता.

मुख्यमंत्र्यांनी लाखो नागरिकांना याचा मिळणार लाभ लक्षात घेत या प्रश्नाची दखल घेत सिडको अध्यक्ष संजय शिरसाट यांना हा प्रश्न मार्गी लावण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार मंगळवारी संजय शिरसाट यांनी समिती सोबत बैठक घेत येत्या आठ दिवसात हा प्रश्न बोर्डात मांडून सोडविण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे सिडको क्षेत्रातील नागरिकांवर वर्षानुवर्षे लादले जाणारे हस्तांतरण शुल्क येणे बंद होणार आहे.



### आठ दिवसात प्रस्ताव तयार होणार

सिडको अध्यक्ष संजय शिरसाट यांनी सिडको भवन येथे नवी मुंबई सिटीजन्स फाऊंडेशन, नवी मुंबई सोसायटी फेडरेशन व सहकारभारतीचे पदाधिकारी यांच्यासोबत बैठक घेतली. यावेळी शिवसेनेचे उपनेते विजय नाहटा देखील उपस्थित होते. यावेळी शिरसाट म्हणाले की, सिडकोच्या उच्च पदस्थ अधिकारी वर्गासोबत ट्रान्सफर चार्जेस रद्द करण्यासंदर्भात सविस्तर चर्चा पूर्ण झाली आहे. पुढील ८ दिवसात या विषयाचा प्रस्ताव तयार होईल. सिडकोच्या संचालक मंडळात संमत केला जाईल, अशी माहिती सिडको अध्यक्ष शिरसाट यांनी शिष्टमंडळास दिली.

### भेडसावणाऱ्या विषयाची तत्परतेने दखल

विजय नाहटा यांनी हा प्रस्ताव आचारसंहिता लागण्यापूर्वी संमत करून घ्यावा लागेल, अशी विनंती शिरसाट यांना केली. शिरसाट यांनी देखील त्यास सकारात्मक प्रतिसाद दिला. नवी मुंबईतील जनसामान्यांना भेडसावणाऱ्या विषयाची तत्परतेने दखल घेऊन त्यावर योग्य पद्धतीने अंमलबजावणी केल्याबद्दल शिरसाट यांचा शिष्टमंडळाने सत्कार केला व त्यांची प्रशंसा केली. नवी मुंबई सिटीजन्स फाऊंडेशन, नवी मुंबई सोसायटी फेडरेशन व सहकारभारतीने सुरू केलेल्या ट्रान्स्फर चार्जेस हटाव मोहिमेला जनसामान्यांकडून उदंड प्रतिसाद दिला आहे..

### मोहिमेला प्रतिसाद

- कुठल्याही प्रकारचे आंदोलन न करता केवळ संवादाच्या माध्यमातून आणि जन चळवळीच्या माध्यमातून सामान्य नागरिक न्याय कसा मिळवू शकतो, समस्येचे निराकरण कसे करू शकतो, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे हस्तांतरण शुल्क रद्द करा यासाठीचा लढा आहे.
- ३ हजार ५०० हून अधिक निवासी संकुलांनी आपले समर्थन पत्र देऊन या मोहिमेला प्रतिसाद दिला आहे. या शिष्टमंडळात सतीश निकम, प्रमोद जोशी, भास्कर म्हात्रे, सुभाष म्हात्रे, सुधीर दाणी त्रिवेणी साळकर, कृष्णकांत निमसे, सुनील छाजेड, सुनील चौधरी, रश्मी सकपाळ, उदय तांदळे, रोहित गुप्ता, विनीत मोरे व अन्य सहकारी उपस्थित होते.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

प्रहार मुंबई | बुधवार, २५ सप्टेंबर २०२४

पाच डंपरसह चालकांच्या विरोधात न्हावा-शेवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

# सिडकोच्या मोकळ्या भूखंडावर अनधिकृतपणे डेब्रिज टाकणाऱ्या विरोधात कारवाई

◆ नवी मुंबई (वार्ताहर):

नवी मुंबईतील सिडकोने संपादित केलेल्या आणि संपादित करण्यात येणाऱ्या भूखंडावर अनधिकृतपणे डेब्रिज टाकणाऱ्याविरुद्ध सिडकोच्या दक्षता विभागाच्या पथकाने सोमवारी मोठी कारवाई केली. यात ५ डंपर आणि त्यावरील चालक (ड्रायव्हर) यांच्या विरोधात न्हावा-शेवा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

सिडको महामंडळाने ठाणे व रायगड जिल्ह्यातील संपादित केलेल्या तसेच संपादित करण्यात येत असलेल्या जमिनीवर, भूखंडावर मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे डंपर



वाहनचालकांकडून डेब्रिज टाकण्यात येत असून, सदरचे डेब्रिज हे मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असल्याचे निदर्शनास आले आहे. सिडको परिक्षेत्रात टाकण्यात येणाऱ्या अनधिकृत डेब्रिजला आळा घालण्याच्या दृष्टीने मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या नेतृत्वाखाली दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग व पोलीस विभाग यांच्यासह दि.२३ सप्टेंबर २०२४ रोजी दुपारी सिडको कार्यक्षेत्रात मोहिम राबवत असताना दुपारी १४:०० वाजताचे सुमारास गव्हाण जासई रोड, एमटीएचएल लेबर कॅम्प, स्टार कंन्टेनर यार्डच्या बाजूला, नवी मुंबई येथे मानवी आरोग्यास हानीकारक असलेले डेब्रिजने भरलेले डंपर क्रमांक १) एमएच-०१-डीआर-१५१५ वरील चालक इम्रान नजीर महमंद सिद्धीक सैय्यद, वय २३ वर्षे, रा. इंदिरानगर हाजीबंदर रोड, हिंदुस्थान लिकर कंपनी जवळ, शिवडी, मुंबई १५, २) एमएच-०१-सीवी-६७८ वरील चालक मुकेश उद्धव सुलकेकर, वय ३० वर्षे, रा. इंदिरानगर हाजीबंदर रोड, हिंदुस्थान लिकर कंपनी जवळ, शिवडी, मुंबई १५, ३) एमएच- ०१- इइ - ८८२८ वरील चालक महमंद अलीम शेख, वय ४१ वर्षे, रा. भारतीय कमलानगर, झोपडपट्टी, सलफन रोड, अँन्टॉप हिल, मुंबई नंर ३७, ४) एमएच - ० १- इइ - ८२४४ वरील चालक सादाब खान अब्दुल वहीद खान, वय ३८ वर्षे, रा. शांतीनगर वडाळा, सतना चाळ, मुंबई, ५) एमएच - ०१ - इएम - ९२५० वरील चालक मोहमंद शरीफ शेख, वय ३९ वर्षे, रा. शास्त्रीनगर, बैगनवाडी, गोवंडी (पश्चिम) मुंबई ४३ हे खाली करण्याच्या प्रयत्नात असताना मिळून आले. सदरचे पाचही डंपर जप्त करण्यात आलेले आहेत.

या डंपर चालकांविरूद्ध न्हावाशेवा पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्रमांक १४७/२०२४, भारतीय न्याय संहिता (बी.एन.सी.) २०२३ चे कलम २७१, ३(५), ६२ प्रमाणे दिनांक २३/०९/२०२४ रोजी १८:१३ वाजता गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात आली आहे. सिडको परिक्षेत्रात अनधिकृत डेब्रिज टाकत असताना कोणी आढळल्यास सिडकोच्या www.cidco.maharashrta.gov.in या वेब साईटवर तसेच संबंधीत पोलीस ठाण्यात कळविण्यात यावे असे याद्वारे आवाहन सिडकोकडून नागरिकांना करण्यात आले आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

**नवराष्ट्र** | मुंबई, २५ सप्टेंबर २०२४

# पाच डंपर जप्त; सिडकोची कारवाई

नवी मुंबई, (वा.) सिडको महामंडळाने संपादित केलेल्या तसेच संपादित करण्यात येत असलेल्या जमीनीवर / भूखंडावर मोठया प्रमाणात अनधिकृतपणे डंपर वाहन चालकांकडून डेब्रीज टाकण्यात येत असून, डेब्रीज हे मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असल्याचे निदर्शनास आले होते.

सिडकोने या डंपरवर कारवाई करत ५ डंपर जप्त केले आहेत. तसेच या पाचही चालकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिडको परिक्षेत्रात टाकण्यात येणाऱ्या अनधिकृत डेब्रीजला आळा घालण्याच्या दृष्टीने मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांच्या नेतृत्वाखाली दक्षता तपास अधिकारी, सुरक्षा विभाग, अभियांत्रिकी विभाग व पोलीस विभाग यांचेसह दिनांक २३ सप्टेंबर रोजी दुपारी सिडको कार्यक्षेत्रात मोहिम राबवत होते.



## मानवी आरोग्यास हानिकारक असलेले डेब्रिज

त्यावेळी दुपारी १४:०० वाजताचे सुमारास गव्हाण जासई रोड, एमटीएचएल लेबर कॅम्प, स्टार कंन्टेनर यार्डच्या बाजूला, नवी मुंबई येथे मानवी आरोग्यास हानीकारक असलेले डेब्रीजने भरलेले डंपर डेब्रिज रिकामे करण्यास आले होते. या डंपरवर कारवाई करण्यात आली. चालक इम्रान नजीर महमंद सिध्दीक सैय्यद, वय २३ वर्षे, चालक मुकेश उध्दव सुलकेकर, वय ३० वर्षे, चालक महमंद अलीम शेख, वय ४१ वर्षे, चालक सादाब खान अब्दुल वहीद खान, वय ३८ वर्षे, चालक मोहमंद शरीफ शेख, वय ३९ वर्षे, हे डंपर डेब्रिज रिकामे करण्याच्या प्रयत्नात असताना मिळून आले. हे पाचही डंपर जप्त करण्यात आलेले आहेत. वर नमुद डंपर चालकांविरुध्द न्हावाशेवा पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे ग गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

# नवराष्ट्र

## गतिमान अंमलबजावणीकरिता अधिकाऱ्यांना दिले निर्देश



**नवी मुंबई,** (वा.) सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट, सिडको यांनी २४ सप्टेंबर २०२४ रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प स्थळाला भेट देऊन प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला. या प्रसंगी व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, शान्तनु गोयल, दिलीप ढोले, गीता पिल्लई, शीला करुणाकरन आणि विमानतळ प्रकल्पाशी संबंधित सिडकोचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

सिडकोतर्फे ११६० हेक्टर क्षेत्रावर, दोन टप्प्यांमध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे देशातील सर्वांत मोठे ग्रीनफिल्ड विमानतळ साकारण्यात येत आहे. विमानतळ हे प्रती वर्ष ९० दशलक्ष प्रवासी आणि २.५ टन मालवाहतुकीकरिता नियोजित आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे विमानांच्या स्वतंत्र प्रवर्तानाकरिता दोन समांतर धावपट्ट्या आणि पूर्ण लांबीचे दोन समांतर टॅक्सी वे असणार आहेत. सार्वजनिक खासगी भागीदारीतून विकसित करण्यात येत असलेल्या विमानतळाच्या विकासाची जबाबदारी सवलतधारक कंपनी एनएमआयएएल यांच्यावर आहे. विकासपूर्व कामे पूर्ण होऊन प्रत्यक्ष विमानतळाच्या कामाला सुरुवात झाली आहे.

Thane Navi Mumbai Palghar Edition
Sep 25, 2024 Page No. 1
Powered by: navbharatlive.com

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS


MUMBAI
WEDNESDAY
SEPTEMBER 25, 2024 **Hindustan Times**

## Engineers are the creators – Shri. Sanjay Shirsat, Hon'ble Chairman



"Engineers are the creators, and hence because of them the nation achieves glory," stated Shri. Sanjay Shirsat, Hon'ble Chairman, CIDCO, during the Engineer's Day event organized by CIDCO Engineers Association. Engineer's Day is celebrated across the country on the birth anniversary of Bharat Ratna Sir M. Visvesvaraya. Due to his significant contributions to various public welfare projects 15th September, his birthday is celebrated as Engineer's Day across the country. On the occasion were present Shri. Shantanu Goel, Joint MD, CIDCO, Shri. Ganesh Deshmukh, Joint MD, CIDCO, Shri. Dilip Dhole, Joint MD, CIDCO, Shri. Suresh Mengade, Chief Vigilance Officer, CIDCO, Smt. Geetha Pillai, CGM, CIDCO, Smt. Sheela Karunakaran, Chief Engineer, CIDCO, Shri. N. C. Bias, Chief Engineer (Navi Mumbai), CIDCO, Smt. Pramada Bidve, Manager (Personnel), CIDCO, Shri. Suresh Thakur, President, CIDCO Engineer's Association, Shri. S. S. Narsapur, General Secretary, CIDCO Engineer's Association along with heads of departments, engineers, officers and employees of CIDCO in large numbers. The programme began with the lighting of the lamp and garlanding the photo of M. Visvesvaraya at the hands of dignitaries. Hon'ble Shri. Sanjay Shirsat offered his best wishes to the engineers of CIDCO on the occasion, and said, "Engineers have played an important role in the development of Navi Mumbai. Engineers are the pillars of the country's development."

Reader Initiative Programme




महाराष्ट्र टाइम्स | मुंबई | बुधवार, २५ सप्टेंबर २०२४

# राडारोडा टाकणारे डम्पर पकडले

**म. टा. वृत्तसेवा,** नवी मुंबई

सिडकोने संपादित केलेल्या जमिनीवर व भूखंडावर मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानिकारक असलेला राडारोडा टाकणाऱ्या डम्परचालकांची सिडकोकडून धरपकड सुरूच आहे. सोमवारी दुपारी सिडकोच्या पथकाने गव्हाण जासई रोड एमटीएचएल लेबर कॅम्पलगतच्या जागेवर राडारोडा टाकण्यासाठी आलेले पाच डम्पर पकडले व डम्पर चालकांवर न्हावा शेवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करून त्यांना ताब्यात घेतले. सिडको कार्यक्षेत्रामध्ये बेकायदा राडारोडा टाकताना कोणी आढळल्यास www.cidco.maharashtra.gov.in या वेबसाइटवर व संबंधित पोलिस ठाण्यात कळवावे, असे आवाहन सिडकोने केले आहे.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

MUMBAI
WEDNESDAY
SEPTEMBER 25, 2024 **Hindustan Times**

## CIDCO's VC&MD, Shri. Vijay Singhal visits various water supply projects of CIDCO



Shri. Vijay Singhal, VC&MD, CIDCO visited the various water supply projects of CIDCO and reviewed the various measures being implemented by CIDCO, and also, instructed the concerned officials and contractors to complete their works in time. On the occasion were present Shri. Ganesh Deshmukh, Joint MD, CIDCO, Smt. Sheela Karunakaran, Chief Engineer (Navi Mumbai International Airport and Special Projects), CIDCO, Shri. P. V. Mul, Superintending Engineer, CIDCO and other concerned officials and employees. CIDCO has undertaken various measures to meet the water demand of the growing population in future in CIDCO jurisdiction. After visiting the major project sites among them, it has been observed that all the works are in progress satisfactorily. The concerned officials have also been instructed to complete these works in time. Hence there is no doubt that there will be sufficient water supply to the residents in CIDCO jurisdiction in the near future.

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
★ मुंबई, बुधवार,
२५ सप्टेंबर २०२४

# राडारोडा टाकणाऱ्या डम्पर चालकांवर कारवाई

## सिडकोच्या दक्षता पथकाकडून सहा डम्पर जप्त

लोकसत्ता प्रतिनिधी



**पनवेल :** मुंबई, ठाणे, नवी मुंबई परिसरातून मोठ्या प्रमाणात निघणारा राडारोडा बेकायदा पद्धतीने पनवेल उरण परिसरातील निर्जन जागेवर टाकण्यात येतो. अशा सहा डम्पर चालकांवर कारवाई करीत डम्पर जप्त करण्यात आले आहेत. ही कारवाई सिडकोच्या दक्षता पथकाने केली आहे.

इम्रान नजीर महम्मद सिद्दिक सैय्यद (२३, रा. इंदिरानगर हाजीबंदर रोड, हिंदुस्थान लिकर कंपनीजवळ, शिवडी, मुंबई), मुकेश उद्धव सुलकेकर, (३०, रा. इंदिरानगर, हाजी बंदर रोड, शिवडी ) महम्मद अलीम शेख (४१, रा. भारतीय कमलानगर, झोपडपट्टी, सलपन रोड, अॅन्टॉप हिल, मुंबई ) सादाब खान अब्दुल वहीद खान, ३८ वर्षे, रा. शांतीनगर वडाळा, सतना चाळ, मुंबई ) मोहम्मद शरीफ शेख, (३९, रा. शास्त्रीनगर, बैगनवाडी, गोवंडी पश्चिम, मुंबई) अशी यातील आरोपींची नावे आहेत. हे सर्व चालक असून त्यांचे डम्पर जप्त करण्यात आले आहेत.

सिडको महामंडळाने संपादित केलेल्या तसेच संपादित करण्यात येत असलेल्या भूखंडावर मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे डम्पर वाहन चालकांकडून राडारोडा टाकण्यात येतो. हा प्रकार मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानिकारक असल्याने त्याच्यावर कारवाई करण्यात येते.

सिडको परिक्षेत्रात टाकण्यात येणाऱ्या अनधिकृत राडा रोडा बेकायदा पद्धतीने टाकणाऱ्यांना आळा घालण्याच्या दृष्टीने मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांच्या नेतृत्वाखाली दक्षता तपास पथक कार्यरत आहे.

याच पथकाने २३ तारखेला दुपारी गव्हाण जासई रोड, एमटीएचएल लेबर कॅम्प, स्टार कन्टेनर यार्डच्या बाजूला, असणाऱ्या भूखंडावर राडारोडाने भरलेले डम्पर रिकामे करीत असताना कारवाई करण्यात आली आहे. त्यांच्या विरोधात संबंधित पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अशी माहिती सिडको मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी दिली.

CIDCO
WE MAKE CITIES
NEWS

लोकमत मुंबई, बुधवार, दि. २५ सप्टेंबर २०२४



सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांनी मंगळवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या प्रगतीचा अधिकाऱ्यांसोबत आढावा घेतला.

# नवी मुंबई विमानतळाचे काम वेळेत पूर्ण करा

## संजय शिरसाट; कामाच्या प्रगतीचा आढावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी मुंबई :** सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांनी मंगळवारी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाला भेट देऊन कामाचा आढावा घेतला. याप्रसंगी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल उपस्थित होते. देशाच्या दृष्टीने हा प्रकल्प महत्त्वाचा आहे. या प्रकल्पाच्या कामाची गती समाधानकारक आहे. असे असले, तरी निर्धारित कालावधीत हे काम पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले आहेत.

सिडकोतर्फे ११६० हेक्टर क्षेत्रावर, २ टप्प्यांमध्ये नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारला जात आहे. त्याअनुषंगाने संबंधित यंत्रणा कामाला लागल्या आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमानांच्या स्वतंत्र प्रवर्तनासाठी दोन समांतर धावपट्ट्या आणि पूर्ण लांबीचे दोन समांतर टॅक्सी वे असणार आहेत. सार्वजनिक खासगी भागीदारीतून विकसित करण्यात येत असलेल्या विमानतळाच्या विकासाची जबाबदारी सवलतधारक कंपनी एनएमआयएएल यांच्यावर आहे.




### इन्स्ट्रुमेंट लँडिंग सिस्टीम चाचणी यशस्वी

३१ मार्च २०२४ पर्यंत विमानतळाचा पहिला टप्पा पूर्ण करून व्यावसायिक वापरासाठी तो खुला करण्याची योजना आहे. त्याअनुषंगाने संबधित यंत्रणा कामाला लागल्या आहेत. भारतीय विमानतळ प्राधिकरणातर्फे नुकतीच सिग्नल चाचणी व इन्स्ट्रुमेंट लँडिंग सिस्टीम चाचणी यशस्वीरीत्या पार पडली. दरम्यान, याप्रसंगी सहव्यवस्थापकीय संचालक शांतनू गोयल, सहव्यवस्थापकीय संचालक दिलीप ढोले, तसेच मुख्य महाव्यवस्थापक (परिवहन व विमानतळ) गीता पिल्लई, मुख्य अभियंता (नवी मुंबई आंतरराष्ट्रीय प्रकल्प व विशेष प्रकल्प) शीला करुणाकरन आदींसह सिडकोचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in




महाराष्ट्र टाइम्स | मुंबई | बुधवार, २५ सप्टेंबर २०२४

# सिडको अध्यक्षांकडून विमानतळकामाची पाहणी

**म. टा. वृत्तसेवा**, नवी मुंबई

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प स्थळाला भेट देऊन सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांनी मंगळवारी प्रकल्पाच्या सद्यस्थितीचा आढावा घेतला.

सिडकोतर्फे ११६० हेक्टर क्षेत्रावर, दोन टप्प्यांत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे देशातील सर्वांत मोठे ग्रीनफिल्ड विमानतळ साकारण्यात येत आहे. सार्वजनिक खासगी भागीदारीतून विकसित करण्यात येत असलेल्या विमानतळाच्या विकासाची जबाबदारी सवलतधारक कंपनी एनएमआयएएल यांच्यावर आहे.

नवी मुंबईसह राज्याच्या आणि देशाच्या विकासासाठी हा प्रकल्प योगदान देणारा आहे. प्रकल्पाच्या गतिमान अंमलबजावणीसाठी कालमर्यादेमध्ये कामे पूर्ण करण्याचे संबंधितांना निर्देशही देण्यात आले असून लवकरच येथून विमानाचे उड्डाण होणार असल्याची माहिती सिडकोचे अध्यक्ष संजय शिरसाट यांनी दिली.